# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलडाणा विभाग,बुलडाणा

**जाक्र.राप/विनि/बुल/आस्था/शिऊ/ ८७३** **दिनांक — ०७/०३/२०२४**
१३

प्रति,

**१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी,**
**प्रशासकीय इमारत, बुलडाणा.**

**२) अंशकालिन प्राचार्य,**
**मूलभूत प्रशिक्षण व अनुषंगिक सूचना केंद्र,**
**व्दारा/- औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगांव.**

**३) मा. उप संचालक, बोर्ड ऑफ ॲप्रेन्टीस ट्रेनिंग,**
**एटीआय कॅमपस,व्ही एन पुरव मार्ग,**
**सायन, मुंबई-४०० ०२२.**

**४) प्राचार्य,**
**औद्योगिक प्रशिक्षण संस्था ----------------------**

**५) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,**
**व्दारा/- औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलडाणा.**

**विषय:- शिकाऊ उमेदवार सत्र २०२३-२४ करीता शिकाऊ उमेदवार नेमणुकीबाबत.**

**संदर्भ:- मध्यवर्ती कार्यालयाचे परिपत्रक क्र. ११/२०१७, पत्र क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१५७७, दि. २२.३.२०१७**

*****

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलडाणा विभागातर्फे सत्र २०२३-२४ करीता आय.टी.आय.उत्तीर्ण कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची एक वर्षाकरीता भरती करावयाची आहे.ऑनलाईन अर्ज करणा-या व पात्रता पूर्ण करणा-या उमेदवाराची त्याच्या आयटीआय गुणांच्या आधारे रिक्त जागा विचारात घेऊन भरती करण्यात येईल,त्याकरीता खालीलप्रमाणे व्यवसायनिहाय जागा भरावयाची आहेत.

| अ.क्र | व्यवसाय | शिकाऊ उमेदवार संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | **मेकॅनिक मोटार व्हेईकल (MMV)** | ४६ | आयटीआय उत्तीर्ण |
| २ | **मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर (MVBB)** | १६ | आयटीआय उत्तीर्ण |
| ३ | **मेकॅनिक [डिझेल ]** | २३ | आयटीआय उत्तीर्ण |
| ४ | **पेंटर जनरल (Painter)** | ०५ | आयटीआय उत्तीर्ण |

नोकरी शोधताय? आमच्या वेबसाईटला भेट द्या Click here

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मेकॅनिक [ रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनर ] | ०७ | आयटीआय उत्तीर्ण |
| ६ | वेल्डर [ गॅस अँड इलेक्ट्रीकल ] | १३ | आयटीआय उत्तीर्ण |
| | एकूण | ११० | |

त्याकरीता अ.क्र. १ ते ६ व्यवसायाकरीता आयटीआय उत्तीर्ण प्रत्येक उमेदवारांनी www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी [रजिस्ट्रेशन] करुन M.S.R.T.C.,BULDANA DIVISION या आस्थापनेसाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. वरील ऑनलाईन नोंदणी [रजिस्ट्रेशन] केलेल्या इच्छुक उमेदवारांना या कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज भरणे आवश्यक आहे.

सदरचे छापील अर्ज आस्थापना शाखा, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, मलकापूर रोड बुलडाणा येथे दि. १५/०३/२०२४ ते दि. २६/०३/२०२४ पर्यंत सकाळी १०.०० ते १५.०० या वेळेत मिळतील व लगेच तेथेच स्विकारले जातील. सरदहू अर्जाची किंमत [जीएसटी १८% सह ] खुल्या प्रवर्गातील शिकाऊ उमेदवारांसाठी रु.५९०/- तसेच मागासवर्गातील उमेदवारांसाठी २९५/- इतकी असून शुल्क उमेदवारांने राष्ट्रीयकृत बँकेच्या डीडीद्वारे [डिमांड ड्राफ्ट] "M.S.R.T.C.FUND A/C BULDANA" या नावाने काढून अर्जासोबत खालील कागदपत्रांसह या कार्यालयास दिनांक २२/०३/२०२४ पर्यंत सादर करावा.

**अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे :-**

१] शाळा सोडल्याचा दाखला.

२] एस.एस.सी. गुणपत्रिका व प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक पात्रतेचे दाखले.

३] आय.टी.आय. गुणपत्रिका सर्व सेमीस्टर जोडणे आवश्यक आहे.

४] जातीचा दाखला

५] आधारकार्ड छायांकित प्रत.

६] पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केलेला अर्ज व आस्थापनेला अप्लाय केल्याची प्रत.

७] अनु.जाती,अनु.जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवार वगळून मागासवर्गातील उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर जोडणे आवश्यक आहे.

अटींची पूर्तता न करणा-या उमेदवारांचे अर्ज,अपूर्ण अर्ज तसेच दिनांक २२/०३/२०२४ नंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची नोद घ्यावी.



टिप :- उमेदवाराने आय टी आय उत्तीर्ण झाल्यापासून ०३ वर्षाच्या आत शिकाऊ उमेदवारी करणे आवश्यक आहे.०३ वर्षानंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाही.तसेच सरकारी अथवा खाजजी कंपनीत एकदा शिकाऊ उमेदवारी कायद्यानुसार शिकाऊ उमेदवारी केली असल्यास ते शिकाऊ उमेदवारीकरीता पात्र होऊ शकत नाही याची नोंद घ्यावी.पात्र ठरलेल्या उमेदवारांचे भारतीय स्टेट बँकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे.

विभाग नियंत्रक,
रा.प.बुलडाणा

प्रति :- यंत्र अभियंता[चा]/ विवाअ/ विवाअ[अप]/ काम.अधिकारी/ विकवअ/ विअ[स्था]/ सुवदअ/ विलेअ/ विसांअ/ विभांअ रा.प.बुलडाणा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

आगार व्यवस्थापक,रा.प.बुलडाणा/ चिखली/ खामगांव/ मेहकर/ मलकापूर/ जळगांव जा/ शेगांव यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

. . . . आपणास सुचित करण्यात येते की,सदर परिपत्रक आपले शाखेतील/ आगारातील कर्मचा-यांचे निदर्शनास आणून द्यावे तसेच सुचना फलकावर प्रदर्शित करावे व तसे केल्याचे या कार्यालयास कळविण्यात यावे.

विभाग नियंत्रक,
रा.प.बुलडाणा